# निशाणी क्र. १४ वरील आदेश

प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. २ कथन करतात की, प्रतिवादीने मुदतीत वादीच्या दाव्यास कैफियत व म्हणणे देणे जरुरीचे होते. परंतु प्रतिवादी ही अडाणी व अशिक्षीत असल्याने व महत्वाची कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने कैफियत व म्हणणे मुदतीत दाखल करता आले नाही. सदर दावा हा निरंतर मनाईचा आहे. दावा हा स्थावर मिळकती संदर्भात असल्यामुळे प्रतिवादीची कैफियत स्वीकारली नाही तर प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे असे नुकसान होईल. सबब कैफियत देणेसाठी झालेला उशीर माफ करण्यात यावा आणि कैफियत स्वीकारण्यात यावी अशी न्यायालयास नम्र विनंती करण्यात येत आहे. प्रस्तुत अर्जाच्या समर्थनार्थ नि.क्र. १५ वरती प्रतिवादीने प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे.

२. सदर अर्जावर लेखी म्हणणे देत वादी कथन करतात की, प्रतिवादीने खोटी कारणे दिली आहेत व ती कायदेशीर नाहीत. कारणाला पुष्टी देणारा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नाही. प्रतिवादी हे जाणीवपुर्वक प्रकरण लांबविण्याचा विचार करीत आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द करावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी दाखल केलेला अर्ज आणि त्यावरील वादी यांचे तर्फे म्हणणे विचारात घेतले. दोन्ही पक्षांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुत दावा हा दावा निरंतर मनाईचा हुकूम प्रतिवादी विरुद्ध व्हावा याकरीता दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादी क्र. २ हे दाव्याकामी दिनांक ०५/०७/२०२३ रोजी हजर झालेले आहेत. प्रतिवादी क्र. २ विरुद्ध १५/१२/२०२३ रोजी विना कैफियतचे आदेश पारित झाले आहेत. प्रतिवादी यांना समन्स लागू झाल्यानंतर तीस दिवसांमध्ये दाव्यास कैफियत देणे बंधनकारक होते. परंतु प्रतिवादी यांना वारंवार संधी देवून देखील त्यांनी कैफियत दाखल करण्यास विलंब केलेला आहे. परंतु दाव्याचे स्वरुप पाहता दावा हा गुणदोषांवर निकाली होणेकरीता दोन्ही पक्षांचे म्हणणे विचारात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे नैसर्गिक न्याय तत्वाचा विचार करता प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरणारे आहे. त्यामुळे मी खालील आदेश पारित करीत आहे.

रे.मु.नं. २९४/२०२३
श्रीमती प्रतिभा आणि ईतर वि. भारत आणि ईतर

**आदेश**

१. प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. २ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब ५००/– रुपये इतक्या कॉस्टसहीत माफ करण्यात येत आहे.

३. प्रतिवादी क्र. २ यांनी वर नमूद कॉस्ट वादी यांना द्यावी असे प्रतिवादीना आदेशित करण्यात येत आहे.

४. सदर कॉस्ट वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी क्र. २ यांची कैफियत/म्हणणे अभिलेखावर घेण्यात येईल.

Sd/-

**(श्रीमती गायत्री एस. पाटील)**

दिनांक: ०६/११/२०२४

३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
बार्शी. जि. सोलापूर.

# CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same word to word as per original Judgment/order".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | **S.V. Kokate (Grade III)** |
| Name of the court | : | **Smt. Gayatri S. Patil** |
| | | **3rd Jt. CJJD & JMFC,** |
| | | **Barshi, Dist. Solapur.** |
| Judgment/order declared on | : | **06/11/2024** |
| Judgment/order signed by Presiding officer | : | **06/11/2024** |
| Judgment/order uploaded on | : | **07/11/2024** |